06 JUN 2024

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ परिसर रोषणाईने उजळला......



३५० व्या शिवराज्याभिषेक दिनाच्या पूर्वसंध्येला शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. यामध्ये महाराजांच्या भव्य पुतळ्यासह ही इमारत विविध रंगांनी उजळून निघाली. (छाया : डॉ. आलोक जत्राटकर)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 JUN 2024

तरुण भारत



कोल्हापूर : ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनाच्या पूर्वसंध्येला शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. यामध्ये प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यासह इमारत विविध रंगांनी उजळून निघाली.

# विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिनानिमित्त रोषणाई

**प्रतिनिधी**
**कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठात शिवराज्याभिषेक सोहळा दिनानिमित्त गुरुवारी (दि. ६) विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सकाळी ७ वाजता पोवाड्याचे ध्वनीमुद्रन, सकाळी ८.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लहान पुतळ्यास पुष्पहार व प्रांगणातील अश्वारुढ पुतळ्याला फुले अर्पण, सकाळी ८.३५ वाजता महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीत सादरीकरण, सकाळी ८.४५ वाजता शिवज्योत रॅली मुख्य प्रशासकीय इमारत, उपहारगृह परीक्षा भवन, राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशिय सभागृहमार्गे मुख्य इमारत येथे सांगता, सकाळी ९.०५ वाजता मर्दानी खेळाचे सादरीकरण, सकाळी ९.३० वाजता राजर्षी शाहू सभागृहात पोवाडा सादरीकरण, सकाळी १०.१० वाजता राजर्षी शाहू संग्राहलयात राजमाता जिजाऊसाहेब प्रतिमा पूजन केले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 JUN 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आज विविध कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवस्वराज्य दिन सोहळ्याचे गुरुवार, दि. ६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ प्रांगणात सकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांचा ध्वनिमुद्रित पोवाडा, सकाळी ८.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ९ वाजता शिवज्योत रॅली काढण्यात येणार आहे. त्यानंतर मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर मर्दानी खेळाचे सादरीकरण केले जाणार आहे.

0 6 JUN 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरचे तापमानवाढ रोखण्याचा पर्यावरणप्रेमींचा निर्धार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

उन्हाळ्यात देशभरात तापमानाने उच्चांक गाठला. कोल्हापूर देखील त्याला अपवाद नाही. कोल्हापुरातील वाढलेल्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूरच्या या वाढलेल्या तापमानासंदर्भात उहापोह करण्यात आला. यावेळी कोल्हापूरची तापमानवाढ रोखण्याचा निर्धार करण्यात आला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात वृक्षारोपण करताना मान्यवर.**

यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव, प्रादेशिक अधिकारी साळोखे, उदय गायकवाड आदींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यानंतर चर्चासत्रात विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी 'शहरी उष्णताद्वीप' या विषयावर मांडणी केली. यामध्ये शहरी भागात उष्णता वाढवणाऱ्या विविध कारणांची माहिती सांगण्यात आली.

यानंतर उदय गायकवाड यांनी कोल्हापूर शहराच्या विशिष्ट अशा गुणधर्मांचा आणि सांख्यिकीचा आलेख मांडला.

त्यानंतर चर्चासत्रात, आर्किटेक्ट वंदना पुसाळकर, गार्डन्स क्लबच्या पल्लवी कुलकर्णी, अनिल चौगुले, अजिंक्य बेर्डे यांनी देखील आपली मते मांडली.

यावेळी, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी साळोखे यांनी शासनाची भूमिका, नेट झीरोच्या दृष्टीने वाटचाल आणि प्रत्येकाने कार्बन फूटप्रिंट कमी करण्याच्या दृष्टीने कशी पाऊले उचलावीत, याबाबत मार्गदर्शन केले.

चर्चासत्राचे प्रमुख पाहुणे डॉ. मधुकर बाचूळकर यांनी त्यांच्या मांडणीमध्ये वृक्षांचे महत्त्व वेगळ्या पद्धतीने अधोरेखित केले. अध्यक्षीय समारोप करताना, विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. प्रकाश राऊत यांनी विद्यापीठाची वृक्ष संवर्धनातील भूमिका स्पष्ट केली. सूत्रसंचालन प्रा. पल्लवी भोसले व डॉ. रसिया पडळकर यांनी केले, तर आभार चेतन भोसले यांनी मानले.

06 JUN 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरचे तापमान रोखण्याचा निर्धार स्वागतार्ह

## -शिवाजी विद्यापीठातील पर्यावरण विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

शहरी भागात उष्णता वाढवणाऱ्या विविध कारण आहेत. डांबरीकरण, कॉंक्रीटचा अति वापर, उंच इमारतींमुळे कमी झालेले वायुविजन, कमी झालेले वृक्ष आच्छादन यासह अन्य कारणे आहेत. त्यामुळे कोल्हापुरचे तापमान रोखण्याचा निर्धार पर्यावरणप्रेमींनी केला आहे, ही आनंदाची गोष्ट आहे, असे मत .पर्यावरण शास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण दिनानिमित्त चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. कोल्हापुरात वाढलेल्या तापमानासंदर्भात उहापोह करण्यसाठी '६ कोल्हापूर ४१ ओम' हा चर्चासत्राचा विषय होता. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

उन्हाळ्यात देशभरात तापमानाच्या काट्याने उच्चांक केला आहे. यंदा तापमान दीड महिना ३९ वर होते. एप्रिल महिन्यात तर चक्क तो ४१ च्या वर गेले होते. कोल्हापूरातील वाढलेले तापमान हा कोल्हापूरकरांसाठी नक्कीच एक गंभीर प्रश्न बनलेला आहे. याला अनेक कारणे जबाबदार आहेत. जागतिक तापमान वाढ, अल निनो परिणाम तसेच



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पर्यावरण दिनानिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वृक्षाला पाणी घालून चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. असावरी जाधव, डॉ. पी. डी. राऊत, उदय गायकवाड आदी.

स्थानिक कारणे देखील या परिस्थितीला कारणीभूत आहेत. अशा अनेक विषयावर चर्चा झाली. उदय गायकवाड यांनी कोल्हापूर शहरात १०० वर्षात वाढलेली लोकसंख्या, जमीन वापराचा पॅटर्न, मोकळ्या जागांचे हस्तांतरण, बागांची दुरावस्था, रस्त्याकडेची झाडी आदी प्रश्न हाताळण्यासाठी काय केले पाहिजे, हे सांगितले.

चर्चासत्रात, आर्किटेक्ट वंदना पुसाळकर, गार्डन्स क्लबच्या पल्लवी कुलकर्णी, अनिल चौगुले, अजिंक्य बेर्डे यांनी .मनोगत व्यक्त केले. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी साळोखे यांनी शासनाची भूमिका, नेट झिरोच्या दृष्टीने वाटचाल आणि प्रत्येकाने कार्बन फूटप्रिंट कमी करण्याच्या दृष्टीने कशी पाऊले उचलावत याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. बाचूळकर यांनी नवीन झाडे लावण्याबाबत आणि असणारी झाडे टिकवण्याबाबत सर्वांनीच गांभीर्याने लक्ष घातले पाहिजे, असे सांगितले.

डॉ. प्रकाश राऊत म्हणाले, विद्यापीठाची वृक्ष संवर्धनातील भूमिका स्पष्ट आहे. विद्यापीठाचे विशाल प्रांगण शहराचे फुफुस म्हणून कार्यरत आहे. ते अधिक चांगल्या पद्धतीने कसे विकसित करता येईल याबद्दलचा आराखडा बनवण्याचे काम सुरु आहे. किमान एक तास ए सी बंद ठेवा, फटाके उडवू नका, कचरा जाळू नका तरच शहराचे तापमान नियंत्रित राहील हे तज्ज्ञांनी सांगितले आहे, त्याचे सर्वांनी पालन केले पाहिजे. सूत्रसंचालन प्रा पल्लवी भोसले व डॉ रसिया पडळकर यांनी केले. आभार चेतन भोसले यांनी मानले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.

0 6 JUN 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरची तापमानवाढ रोखणार

## पर्यावरणप्रेमींचा निर्धार; कृती कार्यक्रम संघटितपणे राबविणार, शिवाजी विद्यापीठात चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठातील चर्चासत्रात बुधवारी कोल्हापूरची तापमानवाढ रोखण्यासाठी संघटितपणे कृती कार्यक्रम राबविण्याचा निर्धार पर्यावरणप्रेमींनी केला. या वेळी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, डॉ. मधुकर बाचूळकर, पी. डी. राऊत, उदय गायकवाड आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. ५ : प्रबोधन, कृती कार्यक्रम, उपक्रमांच्या माध्यमातून कोल्हापूरची तापमानवाढ रोखण्याचा निर्धार आज पर्यावरणप्रेमींनी शिवाजी विद्यापीठात केला. त्यांनी तापमानवाढीचे स्थानिक परिणाम कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याचे निश्चित केले.

पर्यावरण दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे 'कोल्हापूर ४१ अंश सेल्सिअस' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. या वेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, ज्येष्ठ वनस्पतीतज्ज्ञ डॉ. मधुकर बाचूळकर, पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी जगन्नाथ साळोखे, पर्यावरणतज्ज्ञ उदय गायकवाड यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. अध्यक्षस्थानी पर्यावरणशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. पी. डी. राऊत होते.

चर्चासत्रात डॉ. आसावरी जाधव यांनी 'शहरी उष्णताद्वीप' या विषयावर मांडणी केली. यामध्ये शहरी भागात उष्णता वाढवणाऱ्या विविध कारणांचा जसे की, डांबरीकरण, काँक्रिटचा अतिवापर, उंच इमारतींमुळे कमी झालेले वायुविजन, कमी झालेले वृक्ष आच्छादन या कारणांची त्यांनी माहिती दिली. उदय गायकवाड यांनी कोल्हापूर शहराच्या विशिष्ट अशा गुणधर्मांचा आणि सांख्यिकीचा आलेख मांडला. त्यामध्ये गेल्या शंभर वर्षात झालेली लोकसंख्या वाढ, बदललेला जमीन वापराचा पॅटर्न, मोकळ्या जागांचे झालेले हस्तांतरण, बागांची दुरवस्था, रस्त्याकडेची कमी झालेली झाडी असे मुद्दे मांडले. याबाबतचे प्रश्न हाताळण्यासाठी कोणत्या गोष्टी अंगिकाराव्या लागतील याची माहिती दिली. जगन्नाथ साळोखे यांनी शासनाची भूमिका, नेट झिरोच्या दृष्टीने वाटचाल आणि प्रत्येकाने कार्बन फूटप्रिंट कमी करण्याच्या दृष्टीने काय केले पाहिजे, याबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. मधुकर बाचूळकर यांनी त्यांच्या मांडणीमध्ये वृक्षांचे महत्त्व वेगळ्या पद्धतीने अधोरेखित केले. नवीन झाडे लावण्याबाबत आणि असणारी झाडे टिकवण्याबाबत सर्वांनीच अधिक गांभीर्याने लक्ष घातले पाहिजे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. चंगळवादी जीवनशैलीने पर्यावरणाचा वेगाने ऱ्हास होत आहे आणि असेच चालू राहिले तर आपल्याला या संकटापासून कोणीही वाचवू शकत नाही, असेही त्यांनी सांगितले. डॉ. प्रकाश राऊत यांनी विद्यापीठाचे विशाल प्रांगण शहराचे फुप्फुस म्हणून कार्यरत आहे. ते अधिक चांगल्या पद्धतीने कसे विकसित करता येईल याबद्दलचा आराखडा बनवण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले. आर्किटेक्ट वंदना पुसाळकर, गार्डन्स क्लबच्या पल्लवी कुलकर्णी, 'निसर्गमित्र'चे अनिल चौगुले, अजिंक्य बेर्डे यांनीही मते मांडली. प्रा. पल्लवी भोसले, डॉ. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले. चेतन भोसले यांनी आभार मानले.

### स्थानिक परिणाम कमी करण्यासाठी उपाय

तापमानवाढीचा स्थानिक परिणाम कमी करण्याच्या दृष्टीने विविध उपाय आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचे ठरविण्यात आले. त्यात ऊर्जा बचत, वाहनांचा कमी वापर, इंधन ज्वलन कमी करणे, वृक्ष लागवड करणे, झाडांचे संवर्धन करणे, ए. सी. चा वापर टाळणे, कचरा जाळणे टाळणे, आदी उपायांच्या माध्यमातून शहराचे तापमान नियंत्रित ठेवण्याचा कृती कार्यक्रम संघटितपणे राबविण्याचा निर्धार पर्यावरणप्रेमींनी या वेळी केला.